ePaper

## निवडणूक आयोगाची सर्वात मोठी कारवाई! महाराष्ट्रातील 44 पक्षांना हटवले!

वर्ष - 9 । अंक -29 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज ™

### आतील पानांत

- मानलं राव सूर्या दादाला!
- याला म्हणतात टर्निंग पॉईंट झेल!
- ट्रम्प- शी जिनपिंग यांच्यात फोनवर चर्चा!
- सोशल मीडिया हाताबाहेर जातोय

www.mahaenews.com । शनिवार, दि. 20 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### राज्यात आता वातावरन तापले | पडळकरांचं जयंत पाटलांबद्दल वादग्रस्त वक्तव्य

# जयंत पाटील यांच्यावर खालच्या स्तराची टीका!

## विरोधकांकडून निषेध, सत्ताधाऱ्यांनी देखील सुनावलं

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत, त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. गोपीचंद पडळकर यांनी जयंत पाटील यांचा एकेरी उल्लेख करत त्यांच्या वडिलांचाही अपमान केला, दरम्यान यावरून राज्यात आता वातावरण चांगलंच तापलं आहे. गोपीचंद पडळकर यांच्याविरोधात आज राज्यभरात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीनं आंदोल करण्यात आलं आहे.**



### मुख्यमंत्र्यांकडून समज

दरम्यान या वक्तव्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोपीचंद पडळकर यांना फोन करून समज दिली आहे. स्वत: गोपीचंद पडळकर यांनी याबद्दलची माहिती दिली. मुख्यमंत्र्यांचा मला फोन आला होता, त्यांनी मला सांगितलं आहे की अशा प्रकारचे वक्तव्य करू नका, तसेच त्यांनी मला काही सूचना देखील केल्या आहेत, आता मी त्यांच्या सूचनांचे पालन करणार आहे, असं पडळकर यांनी म्हटलं आहे.

दरम्यान दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांनी देखील यावर प्रतिक्रिया दिली आहे. गोपीचंद पडळकर यांचं वक्तव्य हे सुसंस्कृत नाही, महाराष्ट्राच्या राजकारणाची अशी संस्कृती नाही आम्ही पण गेली अनेक वर्षांपासून राजकारण करतो, मात्र टीका करताना भान बाळगले पाहिजे, असं धंगेकर यांनी म्हटलं आहे.

काँग्रेसनं देखील पडळकर यांच्या या वक्तव्यावर तीव्र निषेध नोंदवला आहे, गोपीचंद पडळकर कमरेखालची भाषा गेली अनेक वर्ष बोलत आहेत, त्यांना पाठीशी घालण्याचे काम भाजपचे शीर्ष नेतृत्व करतय. सोलापूर जिल्ह्यातील भाजपचे दोन्ही खासदार पडले त्यामुळे ते जिल्ह्याला सापत्न वागणूक देत आहेत, अशी प्रतिक्रिया यावर काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब कुलकर्णी यांनी दिली आहे.

### अशोक चव्हानांनी देखील टोचले कान

दरम्यान गोपीचंद पडळकर यांच्या या वक्तव्यावर भाजपा खासदार अशोक चव्हाणांनी देखील नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी गोपीचंद पडळकर यांचे चांगलेच कान टोचले. टीका करण्याचा सर्वांना अधिकार मात्र वैयक्तिक पातळीवर टीका करणे अतिशय अशोभानीय आहे. महाराष्ट्रात काही नेते खालच्या स्तराला जाऊन टीका करत आहेत. लोकप्रतिनिधी कोणत्याही पक्षाचा असला तरी इतरांना ही भावना आहेत. त्यांच्या भावना लक्षात ठेऊन आपण पातळी न सोडता आपली भूमिका योग्यरीतीने मंडली पाहिजे, असं अशोक चव्हाण यांनी म्हटलं आहे.

काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी देखील या वक्तव्यावरून पडळकर यांना चांगलंच सुनावलं आहे. जयंत पाटील यांच्याविरुद्ध वापरलेली अर्वाच्य, घाणेरडी आणि अमानुष भाषा ही फक्त एका व्यक्तीचा अपमान नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा आणि मातृशक्तीचा अवमान आहे, असं ठाकूर यांनी म्हटलं आहे.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. या वक्तव्यावरुन आता राज्यातील वातावरण तापलं आहे. या वक्तव्याचे पडसाद सर्वत्र उमटू लागले असून ठिकठिकाणी आंदोलन केले जात आहे. आता याबद्दल एक मोठी बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोपीचंद पडळकर फोन करुन चांगलाच दम भरल्याचे पाहायला मिळत आहे. स्वत: गोपीचंद पडळकर यांनी याबद्दलची माहिती दिली.

### मुख्यमंत्र्यांनी काय सूचना दिल्या?

गोपीचंद पडळकर यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आल्याची माहिती दिली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा मला फोन आला होता. त्यांनी मला अशी वक्तव्य करु नका, अशी सक्तीची सूचना मला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मी त्यांच्या सूचनेचे पालन करेन. मला मुख्यमंत्र्यांनी ज्या सूचना दिल्या आहेत, त्यांचं मी यापुढे पालन करणार आहे, असे गोपीचंद पडळकर म्हणाले.

यावेळी त्यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली. जेव्हा मुख्यमंत्र्यांच्या मातोश्रींवर खालच्या शब्दात टीका केली होती, तेव्हा मी त्यांना फोन केला होता का, हे मी पाहिलं नाही. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आईचा एक AI व्हिडीओही तयार करण्यात आला आहे. तेव्हा पवारांनी मोदींना फोन करुन निषेध व्यक्त केला का, हे जरा कुठे असेल तर मला सांगा, असे गोपीचंद पडळकर म्हणाले.

## देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?



“अशा प्रकारच्या विधानांच आम्ही कधीच समर्थन करणार नाही. गोपीचंद पडळकर हे तरूण नेते आहेत. अनेकदा ते बोलताना आपल्या ॲग्रेशनचा काय अर्थ निघेल हे लक्षात घेत नाहीत. त्यामुळे मी त्यांना सांगितलं की, आपण ॲग्रेशन लक्षात घेऊनच बोललं पाहिजे” असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. “जयंत पाटील यांच्यासंदर्भात गोपीचंद पडळकर यांनी जे स्टेटमेंट केलं, त्या बद्दल मी त्यांच्याशी बोललो. पडळकरांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भात शरद पवारांचा फोन आला. पडळकरांनी जे स्टेटमेंट केलं, ते योग्य आहे, असं माझ मत नाही. आपण जबाबदारीने बोललं पाहिजे, असा पडळकराना सल्ला दिला” असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## अजित पवार काय म्हणाले



महाराष्ट्रात शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणारे टिकतील असं माझं स्पष्ट मत आहे. आज काहीजण वेगवेगळ्या पद्धतीने राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. काहींनी विधानसभेला सपाटून मार खाल्ला, म्हणून काही जण या परिस्थितीचा फायदा उचलता येतो का? याचा प्रयत्न करतायत हे दुर्दैवी आहे. आमची भूमिका आहे, ज्याला जे मिळतय त्याच्या तोंडातून काढून दुसऱ्याला मिळू नये. पण ज्याचा अधिकार आहे, त्याला ते मिळालं पाहिजे. त्यांच्या मागण्या मान्य झाल्या पाहिजेत” असं अजित पवार म्हणाले.

महापालिका प्रशासनाची नवीन कार्यपद्धती

## नागरी समस्या सोडविण्यासाठी नवीन कार्यपद्धती

# पालिकेचे अधिकारी आता रस्त्यांवर!

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील रस्त्यांवर होणारी अतिक्रमणे, जागोजागी पडलेले खड्डे, तुंबलेली गटारे यासह नागरिकांना भेडसावणाऱ्या अन्य समस्यांची जाणीव अधिकाऱ्यांना व्हावी, यासाठी अधिकाऱ्यांनी आता थेट रस्त्यांवर उतरण्याचा आदेश महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिले आहेत. काही ठिकाणी महापालिका आयुक्त हे स्वत: भेट देणार आहेत. या पद्धतीने कामकाज करण्यासाठी महापालिका प्रशासनाने नियोजन केले आहे. त्यामध्ये पथ, अतिक्रमण, मलनिस्सारण यांच्यासह महत्त्वाच्या विभागांचा समावेश असणार आहे.**

## आयुक्तही नागरिकांची भेटी घेणार




शहरातील विविध भागांतील नागरिकांना दररोज नवीन प्रश्नांना सामोरे जावे लागते. गेल्या काही दिवसांपासून शहरात झालेल्या पावसामुळे महापालिकेच्या पथ विभागाने केलेल्या कामाची गुणवत्ता समोर आली आहे. मुख्य रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांमुळे त्यामधून वाहन चालविताना नागरिकांची आणि वाहनचालकांची तारांबळ उडत आहे. पावसाचे पाणी वाहून न जाता रस्त्यावरच साचून राहत असल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.रस्ते, पदपथांवर विक्रेते, दुकानदार अतिक्रमण करत असल्याने पादचाऱ्यांना त्रास होत आहे. काही भागात दुकानांचे साहित्य थेट रस्त्यावर ठेवल्याने रस्ते अरुंद बनले आहेत. याबाबतच्या तक्रारी नागरिकांकडून महापालिका प्रशासनाकडे करण्यात आल्या आहेत. याची दखल घेत महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना आवश्यक त्या सूचनाही केल्या होत्या.मात्र याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर अभियंता, अधीक्षक अभियंता यांना नागरिकांच्या अडचणी, प्रश्न समजावेत, यासाठी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून पाहणी करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिल्या आहेत.पुढील काही दिवसांत महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी यांच्यासह उपायुक्त, अतिरिक्त आयुक्त प्रत्यक्ष शहरातील विविध भागांत फिरून प्रश्न जाणून घेणार आहेत. त्याचे नियोजन करण्यात येत आहे. यामध्ये पथ, अतिक्रमण, मलनिस्सारण यांच्यासह इतर महत्त्वाच्या विभागांचा समावेश असणार आहे,' असे आयुक्त राम यांनी सांगितले.स्थानिक पातळीवर येणाऱ्या समस्या, अडचणी यांची जाणीव संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना व्हावी, त्यासाठी प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाणे आवश्यक आहे. यासाठी सर्व अधिकारी रस्त्यावर उतरून पाहणी करणार आहेत. महापालिका आयुक्त म्हणून स्वत: यामध्ये सहभागी होणार आहे. त्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागतील.शहरातील विविध भागांतील नागरिकांना दररोज नवीन प्रश्नांना सामोरे जावे लागते. गेल्या काही दिवसांपासून शहरात झालेल्या पावसामुळे महापालिकेच्या पथ विभागाने केलेल्या कामाची गुणवत्ता समोर आली आहे. मुख्य रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांमुळे त्यामधून वाहन चालविताना नागरिकांची आणि वाहनचालकांची तारांबळ उडत आहे. पावसाचे पाणी वाहून न जाता रस्त्यावरच साचून राहत असल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.रस्ते, पदपथांवर विक्रेते, दुकानदार अतिक्रमण करत असल्याने पादचाऱ्यांना त्रास होत आहे. काही भागात दुकानांचे साहित्य थेट रस्त्यावर ठेवल्याने रस्ते अरुंद बनले आहेत. याबाबतच्या तक्रारी नागरिकांकडून महापालिका प्रशासनाकडे करण्यात आल्या आहेत. याची दखल घेत महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना आवश्यक त्या सूचनाही केल्या.

### फिरून प्रश्न जाणून घेणार आहेत

मात्र याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर अभियंता, अधीक्षक अभियंता यांना नागरिकांच्या अडचणी, प्रश्न समजावेत, यासाठी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून पाहणी करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिल्या आहेत. पुढील काही दिवसांत महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी यांच्यासह उपायुक्त, अतिरिक्त आयुक्त प्रत्यक्ष शहरातील विविध भागांत फिरून प्रश्न जाणून घेणार आहेत. त्याचे नियोजन करण्यात येत आहे.

# कोंडी सोडविण्यासाठी रिक्षा थांब्यांचा उतारा

## कोंडी कमी करण्यासाठी 255 रिक्षा थांबे कमी करण्याचा निर्णय

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील मंदावलेली वाहूतक आणि ठिकठिकाणी होणारी कोंडी सोडविण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) शहरातील २५५ रिक्षा थांबे कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या शहरात एक लाख ४५ हजार रिक्षा असून, त्यांच्यासाठी ६९५ थांबे निश्चित केले आहेत.**



शहरात वाहतुकीला अडथळे ठरणारे अतिक्रमण, बांधकामे आणि इतर कारणे शोधून त्यावर उपाययोजना करण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार पुणे आरटीओ, वाहतूक पोलीस आणि पुणे महापालिका यांच्या वतीने नुकतेच रिक्षा थांब्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये रिक्षा थांब्याचे ठिकाण निश्चित करण्यासाठी ४१ पोलीस ठाण्यांच्या हद्दीचा विचार करण्यात आला असून, केवळ ६९५ थांबे निश्चित करण्यात आले. उर्वरित २५५ स्थानके रद्द करून या अहवालाला प्रादेशिक परिवहन समितीने मंजुरी दिली. परिवहन विभागाच्या २०१५ पूर्वी रिक्षांची संख्या एक लाखाच्या आत असताना ९५० थांबे मंजूर केले होते. हळूहळू रिक्षांच्या संख्येत वाढ झाली आहे. सध्या शहरात एक लाख ४५ हजारांपेक्षा अधिक रिक्षा असताना आरटीओने २५५ रिक्षा थांबे रद्द केले आहेत.दरम्यान, या निर्णयाविरोधात रिक्षाचालक संघटना आक्रमक झाल्या आहेत. रिक्षा थांबे रद्द करून नक्की कुठली वाहतूककोंडी कमी होणार आहे, वाहतूककोंडीला केवळ रिक्षाथांबे जबाबदार कसे, इतर वाहने रस्त्यावर बिनदिक्कत थांबत नाहीत का, असा प्रश्न स्वारगेट इन गेट एसटी स्टँड रिक्षा संघटनेचे सल्लागार बापू भावे यांनी उपस्थित करून थांबे वाढविण्याची मागणी केली.

### 'आरटीओ'चे सर्वेक्षण अपुरे आहे

त्याचा अहवाल प्रादेशिक परिवहन समितीसमोर मांडला. त्याला मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार पुणे महापालिका जागा उपलब्ध करून देणार आहे. थांबा ठरविताना वाहतुकीला अडथळा ठरणार नाही, याचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे. रिक्षांची संख्या वाढत असताना थांब्यांची संख्या कमी करण्याचे गणित कसे सुचले हे अद्याप लक्षात आलेले नाही. 'आरटीओ'चे सर्वेक्षण अपुरे आहे.

**महापालिका निवडणूक** आरक्षणानुसार पन्नास टक्के महिला

# पिंपरी महापालिका सभागृहात 'महिलाराज'!

## आरक्षण तसेच खुल्या जागांवरही महिला निवडणुक रिंगणात

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**




"पिंपरी चिंचवड |प्रतिनिधी महापालिका निवडणूक ३१ जानेवारीपूर्वी होणार, हे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निश्चित झाले आहे. त्यानुसार महापालिकेत नवीन पदाधिकारी अवघ्या चार महिन्यांत मिळणार आहेत. या मध्ये आरक्षणानुसार पन्नास टक्के महिला असतील. शिवाय, खुल्या जागांवरही महिलांना निवडणूक लढविता येणार आहे. त्या जागांवर विजयी झालेल्या महिलांमुळे सभागृहातील 'महिलाराज' वाढणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना पन्नास टक्के आरक्षण आहे. शिवाय, आरक्षित संवर्गासह अन्य खुल्या जागांवरही महिला निवडणूक लढवू शकतात. पिंपरी चिंचवड महापालिकेतील लोकनियुक्त सदस्यांची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली आहे. तेव्हापासून प्रशासक म्हणून आयुक्त कारभार पहात आहेत. हा कालावधी साडेतीन वर्षांपेक्षा अधिक झाला आहे. त्यामुळे निवडणूक लढविण्यासाठी प्रत्येक पक्षातील इच्छुकांची संख्याही वाढली आहे. त्यात अनुभवी माजी महिला सदस्यांसह नव्याने राजकारणात आलेल्या युवतींची संख्या अधिक असल्याचे विविध पक्ष, तसेच पक्षांच्या विविध बैठकीतील उपस्थितीवरून दिसते.

आंदोलने, समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाकडे जाणारी शिष्टमंडळे यात महिलांची संख्या लक्षणीय असते. त्यामुळे नेतृत्वाच्या लढाईत जिंकण्यासाठी महापालिका निवडणूक लढविण्याच्या लढाईतही त्या उतरू शकतात, असे शहरातील चित्र आहे.

यापूर्वीची स्थिती २०१२ ते २०१७ मध्ये महापालिकेच्या १२८ जागांसाठी द्विसदस्यीय पद्धतीने निवडणूक झाली होती. त्यात ६४ ऐवजी ६६ महिला निवडून आल्या होत्या. प्रभाग ११ आणि प्रभाग २६ मधील दोनही सदस्य महिला होत्या. २०१७ ते २०२२ मध्ये महापालिकेच्या १२८ जागांसाठी चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक झाली होती. त्यात ६४ महिला निवडून आल्या होत्या.

### एकूण जागा १२८

२०२६ ते २०३१ मध्ये होणाऱ्या संभाव्य निवडणुकीनुसार महापालिकेच्या १२८ जागा असून, चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने निवडणूक होणार आहे. प्रत्येक संवर्गातील खुल्या जागांसह सर्वसाधारण प्रवर्गातूनही महिला निवडणूक लढवू शकतात. त्यांवर विजय मिळवल्यास नव्या सभागृहात महिलांची संख्या वाढणार आहे. या निवडणुकीत एकूण जागा १२८ आहेत . त्यापैकी ५० टक्के आरक्षणानुसार ६४ महिला निवडून येतील.

# पिंपरीत झळकले 'आय लव मोहम्मद'चे बॅनर

## मोरवाडी चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान काढली निषेध रॅली

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कानपूरच्या रावतपूर येथील सैय्यद नगर भागात 'आय लव मोहम्मद' असा बोर्ड लावण्यात आल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या घटनेचे पडसाद पिंपरीतही उमटले. शुक्रवारी (दि. १९) पिंपरीतील मोरवाडी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान निषेध रॅली काढून मुस्लीम बांधवांनी 'आय लव मोहम्मद'चे बॅनर झळकावत जोरदार घोषणाबाजी केली.**




मोरवाडी चौकात जमलेला मोठा जमाव नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाकडे सरसावला. या वेळी काढण्यात आलेल्या निषेध रॅलीत तरुण, ज्येष्ठ तसेच नागरिकांची सहभाग घेतला होता. रॅलीदरम्यान सर्वांच्या हातात 'आय लव मोहम्मद' असे लिहिलेले बॅनर आणि फलक दिसत होते. धार्मिक भावना व्यक्त करणाऱ्या घोषणा देत जमाव पिंपरी चौकात दाखल झाला. त्यानंतर कानपूरमधील घटनेचा तीव्र निषेध नोंदवला. संघटनांचा सक्रिय सहभाग या निषेध रॅलीत स्थानिक मुस्लिम संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवक तसेच धार्मिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने कानपूरमधील प्रकाराचा तीव्र शब्दांत निषेध करत नाराजी व्यक्त केली. "धार्मिक भावना दुखावणारी कोणतीही कृती सहन केली जाणार नाही, अशा प्रकाराला तातडीने आळा बसला पाहिजे," असा इशारा दिला.

### पोलिसांचा बंदोबस्त

मोठ्या प्रमाणावर जमलेली गर्दी पाहून पोलिसांनीही सुरक्षेची तयारी केली होती. पिंपरी, दापोडी आणि भोसरी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी याठिकाणी मोठ्या संख्येने तैनात होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, रॅलीत शिस्त अबाधित राहावी यासाठी वाहतूक पोलिसांनीही विशेष खबरदारी घेतली. संपूर्ण परिसरात पोलिसांचा तगडा फौजफाटा तैनात असल्याचे दृश्य पाहायला मिळाले.




# वोट चोरीची पुन्हा 'पोल'खोल!

**विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी १८ सप्टेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीत घेतलेल्या विशेष पत्रकार परिषदेत भारतीय निवडणूक प्रक्रियेच्या मुळावर हल्ला करणाऱ्या 'वोट चोरी फॅक्टरी'चे वास्तव पुन्हा उघडकीस आणले. ही केवळ एक राजकीय तक्रार नसून, संपूर्ण लोकशाही व्यवस्थेवर केंद्रीकृत, तांत्रिक आणि संघटित हल्ल्याची भयावह कथा आहे.**

"ये तो सिर्फ झाकी हे, हाइड्रोजन बॉम्ब अभी बाकी हे" या उर्दू शेरने सुरुवात करून राहुल गांधींनी आपल्या आरोपांची तीव्रता अधोरेखित केली. त्यांनी कर्नाटक आणि महाराष्ट्रातील ठोस पुरावे मांडले. या पुराव्यांतून हे स्पष्ट होते की लाखो मतदारांची नावे मतदार यादीतून हटवली जात आहेत- विशेषतः ओबीसी आणि दलित मतदारांची. ही प्रक्रिया केवळ तांत्रिक चूक नसून, सॉफ्टवेअरद्वारे ऑटोमेटेड आणि केंद्रीकृत आहे, असा त्यांचा ठाम दावा आहे. या वक्तव्याने निवडणूक आयोग (ईसीआय) आणि केंद्र सरकारच्या निष्पक्षतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.पत्रकार परिषदेत राहुल गांधींनी कर्नाटकातील घटनांना केंद्रस्थानी ठेवले. या घटना म्हणजे "व्होट चोरी"ची ढळढळीत उदाहरणे आहेत. आळंद विधानसभा मतदारसंघात या साखळीचे सर्वात भयावह चित्र दिसते. येथे तब्बल ६,३०० मतदारांची नावे मतदार यादीतून अचानक डिलीट करण्यात आली. एकाच ठिकाणी इतक्या मोठ्या संख्येने मतदरांची नावे नाहिशी होणे नैसर्गिक नसून, नियोजित षड्यंत्राचे लक्षण आहे. या प्रकरणात सर्वाधिक आश्चर्यकारक म्हणजे एका सामान्य महिलेच्या मोबाइल नंबरचा गैरवापर करण्यात आला आहे. गोदाबाई या महिलेच्या नंबरवरून त्यांच्या माहितीशिवाय १२ मतदारांची नावे हटवली गेली. गोदाबाई स्वतःही याबाबत अनभिज्ञ असल्याने ही कारवाई पूर्णपणे बनावट आणि बेकायदा ठरते.याशिवाय, डिलीट करण्याच्या प्रक्रियेसाठी वापरलेले मोबाइल नंबर हे सर्व कर्नाटकाच्या बाहेरील राज्यांतील असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे, ही कारवाई स्थानिक पातळीवर नसून, राज्याच्या सीमेपलीकडे केंद्रीकृत यंत्रणेद्वारे चालवली जात आहे. पत्रकार परिषदेत प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या सूर्यकांत नावाच्या व्यक्तीने आपला अनुभव सांगितला, "माझ्या मोबाईल नंबरवरून १२ मतदारांची नावे डिलीट झाल्याची नोंद आहे, पण मी स्वतः अशी कोणतीही विनंती केलेली नाही." ही उदाहरणे दाखवतात की सामान्य नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचा वापर करून मतदारांचा हक्क हिरावला जात आहे.राहुल गांधींनी या घटनांना जोडून सांगितले की, ही केवळ व्यक्तिगत चूक नाही, तर एका सॉफ्टवेअरद्वारे चालवली जाणारी "ऑटोमेटेड डिलीशन प्रक्रिया" आहे. यात मोबाइल रिक्वेस्ट टाकणे, ओटीपी जनरेट करणे आणि डिलिट कमांड देणे, ही सर्व कामे यांत्रिकरित्या केली जातात. कर्नाटकातील ही पद्धत केवळ एका मतदारसंघापुरती मर्यादित नसून, प्रादेशिक स्तरावर पसरली आहे. त्याचा थेट परिणाम निवडणुकीच्या निकालांवर होतो. राहुल गांधींच्या आरोपांचा केंद्रबिंदू म्हणजे निवडणूक आयोगाची भूमिका. कर्नाटक पोलिसांच्या गुन्हे शोध विभागाने (सीआयडी) गेल्या १८ महिन्यांत ईसीआयला १८ पत्रे लिहून तपशीलवार माहिती मागवली. उदाहरणार्थ डिलीट प्रक्रियेसाठी वापरलेले मोबाईल नंबर, आयपी ॲड्रेस, लोकेशन डेटा, ओटीपी रेकॉर्ड्स आणि सर्व्हर लॉग्ज. मात्र, आयोगाकडून एकही पत्राला उत्तर आले नाही. सप्टेंबर २०२५ मध्ये पाठवलेले शेवटचे पत्रही उत्तराविना राहिले आहे. यावरून राहुल गांधींनी थेट आरोप केला: "आयोग जाणूनबुजून ही माहिती दडवत आहे आणि 'वोट चोरी गँग'ला संरक्षण देत आहे. ही संस्था आता पारदर्शकतेच्या विरुद्ध उभी आहे."या संदर्भात त्यांनी केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना थेट आव्हान दिले, "एक आठवड्यात ही माहिती कर्नाटक सीआयडीला द्या, अन्यथा तुम्ही भारतीय लोकशाहीच्या खुनात भागीदार आहात, हे सिद्ध होईल." हा इशारा केवळ प्रशासकीय दबाव नसून, जनतेसमोर आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारा आहे. राहुल गांधींनी सांगितले की, ईसीआयकडून मिळणारी अंतर्गत माहितीच आता या षड्यंत्राचे पुरावे उघड करत आहे, ज्यामुळे संस्थेची विश्वासार्हता धोक्यात आहे.



## प्रसंगिक »

### डोळस अभ्यासक


***छत्रपतींचे आणि त्यानिमित्ताने इतिहासाचे चिकित्सक आणि विचक्षण अभ्यासक असलेल्या गजानन मेहेंदळे यांनी इतिहास आणि दंतकथा यांची गल्लत होऊ दिली नाही.***

एकेका विषयात स्वत:ला गाडून घेऊन आयुष्यभर त्या विषयाचा ध्यास घेणाऱ्या उत्तम अभ्यासकांची थोर परंपरा या राज्यास आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, 'ज्ञानकोश'कार केतकर, त्र्यं. चि. शेजवलकर, सेतुमाधवराव पगडी, अलीकडच्या काळातील रा. चिं. ढेरे असे अनेक महानुभावांचे दाखले यासंदर्भात देता येतील. गजानन भास्कर मेहेंदळे हे या मालिकेतील. ते आकस्मिक गेले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचा प्राण घेतला. गुरुगृही राहून २४ तास संगीतसाधनेची पूर्वीची परंपरा ज्याप्रमाणे कालानुरूप लुप्त होत गेली, तशीच एकेका विषयासाठी आयुष्य वेचणाऱ्यांची परंपराही लुप्त होत चालली आहे. गजाभाऊअशा पद्धतीने अभ्यास करणाऱ्यांतील बहुधा शेवटचे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने काय गमावले याचा विचार करू गेल्यास बरेच काही वजा होताना दिसते.

भारताचे शेजारी देश काय किंवा आग्नेय आशियाई देश काय- राजकीय अस्थिरतेचे अनेक धक्के या देशांना आजवर बसलेले आहेत. तरीही सध्याची परिस्थिती कधी नव्हे इतकी गंभीर आहे कारण शेजारी देशांमधील अस्थैर्याच्या झळा काही प्रमाणात तरी भारतासही बसणार, हे आता दिसते आहे.

# हवालदिल जगात भारत काय करू शकतो?

नेपाळमधला राजकीय संघर्ष आणि तेथे नवी राजकीय घडी बसवण्याचे प्रयत्न ताजेच आहेत पण बांगलादेशात वर्षभर उलटले तरी अशी नवी घडी काही बसत नाही, हे आपण पाहातो आहोत. आग्नेयेकडच्या थायलंड देशात पंतप्रधानांनाच न्यायालयीन आदेशामुळे पद सोडावे लागले आणि थायलंड- कंबोडियातील सीमावाद आता हिंसक पातळीला पोहोचला आहे. आपल्याला थायलंडपेक्षा म्यानमार जवळचा. तेथे तर ('आर्म्ड फोर्सेस लोकेशन ॲण्ड इव्हेन्ट डेटा' या संस्थेच्या विदेनुसार) सन २०२१ मध्ये आँग सान स्यू क्यी यांना पदभ्रष्ट करून आलेल्या लष्करी राजवटीनंतर आजवर ८० हजार सामान्यजन व सैनिक मारले गेले आहेत. भारताच्या पश्चिमेकडला पाकिस्तान हा तेथील सत्ताधाऱ्यांनीच खतपाणी घालून वाढवलेले इस्लामी अतिरेकी गट आणि रसातळाकडे जाणारी अर्थव्यवस्था, ती सावरण्यास असमर्थ असणारे प्रशासन यांत गोते खातो आहे. दक्षिणेकडला श्रीलंका हा देश गेल्या तीन वर्षांत,



तेथील राष्ट्राध्यक्षांच्या हकालपट्टीनंतर शांत दिसतो खरा. पण ती हकालपट्टी ज्या जनआंदोलनाच्या रेट्यानंतर झाली, त्या आंदोलनाची खदखद आर्थिक दुरवस्थेबद्दलही होती. ती अवस्था आजही कायम दिसते, कारण श्रीलंकेच्या आर्थिक प्रगतीचा वेग गेल्या तीन वर्षांत वाढल्याची काही चिन्हे नाहीत.

भारताच्या उत्तर सीमांना चीनच्या दंडेलीचा धोकाही आज कधी नव्हे इतका वाढला आहे.भारतासाठी ही संकटे उंबरठ्याबाहेरची मानून चालणार नाही. बांगलादेशातून येणाऱ्या निर्वासितांच्या प्रवाहामुळे भारताच्या पूर्वेकडील राज्यांमध्ये सामाजिक अस्वस्थता आणि व्यत्यय निर्माण होत आहे; पाकिस्तानकडून येणाऱ्या सीमापार दहशतवादाच्या कधीही न संपणाऱ्या धोक्यामुळे एप्रिल-मेमध्ये युद्ध भडकण्याची शक्यता निर्माण झाली होती; आणि आता नेपाळच्या अस्थिर राजकारणामुळे चीनला हस्तक्षेप करण्याची आणखी एक संधी मिळाली आहे. या ताण्याबाण्यांकडे दुर्लक्ष करणे खूप मोठे असल्याने, धक्क्यांच्या या एकामागोमाग, किंवा खरेतर एकाचवेळी- आणि त्याही अनेक दिशांनी येणाऱ्या लाटांना कसे तोंड द्यायचे हा प्रश्न भारतापुढे आज आहे. कारण अखेर, या एकंदर प्रदेशात काहीएक स्थैर्य निर्माण करण्यासाठी भारतालाही वाटा उचलावा लागणारच. तो कसा उचलायचा आणि किती हा प्रश्न आहे.नेपाळचे उदाहरण बोलके आहे. या देशाने दोन दशकांपूर्वीच्या माओवादी हिंसाचारापासून ते सर्वसंमत राज्यघटनेपर्यंत मजल मारली खरी पण वारंवार सत्ताधारी आघाड्यांत होणारे बदल, आलटून पालटून तेच चेहरे सत्तेत असणे असेच चालत राहिले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## परिवहन विभाग सज्ज! तिसऱ्यांदा गुन्हा केल्यास परवाना रद्द करणार

# वाळू माफियाविरोधात परिवहन विभाग सज्ज!

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**माफिया राज्यात अनधिकृतपणे वाळू, गौण खनिजांचे उत्खनन करून, त्याची वाहतूक करीत आहेत. अनधिकृतपणे होणाऱ्या कृत्यात सहभागी वाहनधारकांना लगाम लावण्यासाठी, परिवहन विभागाने पावले उचलली आहेत. याबाबत पहिल्या गुन्ह्यासाठी ३० दिवस, दुसऱ्या गुन्ह्यासाठी ६० दिवसांसाठी परवाना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच वाहनास अटकाव केला जाईल. तर, तिसऱ्या गुन्ह्यासाठी थेट वाहन अटकाव करून परवाना रद्द करण्यात येणार आहे.**

## वाहनास अटकाव केला जाईल




राज्यात मोठ्या प्रमाणात वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृतपणे उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करीचे वारंवार प्रकार घडत असल्याचे निर्दर्शनास येत आहे. महसूल आणि पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी, वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ठोस कारवाई करण्यात येणार आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ८६ मधील तरतुदीनुसार विभागीय कारवाई करण्याचा निर्णय राज्य परिवहन प्राधिकरणाने घेतला आहे.मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११३ चा भंग करून सकल भारक्षमतेपेक्षा अतिरिक्त वजनाच्या वाळू व इतर गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या परवानाधारकांवर विभागीय कारवाई करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास आहेत. या बाबी विचारात घेऊन राज्य परिवहन प्राधिकरणाने १८ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित बैठकीत वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या परवान्यावर मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८६ मधील तरतुदीनुसार विभागीय कारवाई करण्याचे निर्देश राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांना दिले आहेत.राज्यात मोठ्या प्रमाणात वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृतपणे उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करीचे वारंवार प्रकार घडत असल्याचे निर्दर्शनास येत आहे. महसूल आणि पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी, वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ठोस कारवाई करण्यात येणार आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ८६ मधील तरतुदीनुसार विभागीय कारवाई करण्याचा निर्णय राज्य परिवहन प्राधिकरणाने घेतला आहे.

## वाहनांवर ठोस कारवाई

अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ठोस कारवाई करण्यात येणार आहे. मोटार वाहन अधिनियम, विभागीय कारवाई करण्याचा निर्णय राज्य परिवहन प्राधिकरणाने घेतला आहे.मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११३ चा भंग करून सकल भारक्षमतेपेक्षा अतिरिक्त वजनाच्या वाळू व इतर गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या परवानाधारकांवर विभागीय कारवाई करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास आहेत.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११३ चा भंग करून सकल भारक्षमतेपेक्षा अतिरिक्त वजनाच्या वाळू व इतर गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या परवानाधारकांवर विभागीय कारवाई करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास आहेत. या बाबी विचारात घेऊन राज्य परिवहन प्राधिकरणाने १८ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित बैठकीत वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या परवान्यावर मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८६ मधील तरतुदीनुसार विभागीय कारवाई करण्याचे निर्देश राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांना दिले आहेत. माफिया राज्यात अनधिकृतपणे वाळू, गौण खनिजांचे उत्खनन करून, त्याची वाहतूक करीत आहेत. अनधिकृतपणे होणाऱ्या कृत्यात सहभागी वाहनधारकांना लगाम लावण्यासाठी, परिवहन विभागाने पावले उचलली आहेत. याबाबत पहिल्या गुन्ह्यासाठी ३० दिवस, दुसऱ्या गुन्ह्यासाठी ६० दिवसांसाठी परवाना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच वाहनास अटकाव केला जाईल. तर, तिसऱ्या गुन्ह्यासाठी थेट वाहन अटकाव करून परवाना रद्द करण्यात येणार आहे.राज्यात मोठ्या प्रमाणात वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृतपणे उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करीचे वारंवार प्रकार घडत असल्याचे निर्दर्शनास येत आहे.

# संरचनेला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळल्या

## मराठवाडा, अहिल्यानगरमधून 33 याचिका दाखल

| सातारा |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांसह अहिल्यानगरमधीलही जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या अनुक्रमे गट व गणांच्या संरचनेला वेगवेगळ्या मुद्यांच्या आधारे आव्हान देणाऱ्या सुमारे ३३ याचिका व दिवाणी अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे न्या. मनीष पितळे व न्या. वाय. जी. खोब्रागडे यांनी फेटाळल्या. या याचिकांवर यापूर्वी १० सप्टेंबर रोजी सुनावणी झाली होती.**



यासंदर्भातील निकाल खंडपीठाने राखून ठेवला होता. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, नांदेड यासह अहिल्यानगर जिल्ह्यातून या याचिका दाखल झाल्या होत्या. याचिकांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थामधील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या गट, गणाची अंतिम संरचना यापूर्वी आदेशित करण्यात आली आहे. त्यामध्ये काही गावे गटामध्ये समाविष्ट झालेली आहेत, तर काही वगळण्यात आली आहेत., दळणवळणाची रचना, २०१७ ची गट-गण रचना आदी विविध मुद्यांच्या आधारे खंडपीठात याचिका दाखल करून आव्हान देण्यात आले होते. या याचिकांवर यापूर्वीच्या सुनावणीवेळी ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत कातनेश्वर, ॲड. राजेंद्र देशमुख, ॲड. रवींद्र गोरे आदींनी युक्तिवाद केला होता.

## दिवाणी अर्ज फेटाळण्यात आले

तर शासनाच्या वतीने मुख्य सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे यांनी बाजू मांडली होती.शासनाने कायद्याने विहित केलेल्या आणि अवलंबलेल्या प्रक्रियेस आक्षेप नाही. सर्वोच्च न्यायालयाने विविध निर्णयानुसार निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यासाठी मर्यादितच वाव असतो. राहुल रमेश वाघ या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची प्रक्रिया चार महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. या कायद्याच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या विहित चौकटीचा विचार करता याचिकाकर्ते या प्रकरणांसाठी हस्तक्षेप करण्यास योग्य कारणे दर्शवू शकले नाहीत, आदींवरू सर्व याचिका व दिवाणी अर्ज फेटाळण्यात आले.

## फोनवर चर्चा

## अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची लगेचच मोठी घोषणा

# ट्रम्प-शी जिनपिंग यांच्यात फोनवर चर्चा!

## मिडिया प्लॅटफॉर्म टिकटॉकसाठी करार



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी शुक्रवारी अनेक दिवसांच्या व्यापार संबंधांमधील तणावानंतर प्रथमच फोनवरून संवाद साधला. या संवादानंतर ट्रम्प यांनी लगेचच अमेरिका आणि चीन यांच्यात सोशल मिडिया प्लॅटफॉर्म टिकटॉकसाठी करार झाल्याची घोषणा केली आहे. इतकेच नाही तर ट्रम्प यांनी ते पुढील वर्षी चीनला भेट देतील आणि योग्य वेळी शी देखील अमेरिकेचा दौरा करतील असेही यावेळी जाहीर केले.**

मी आत्ताच चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याबरोबर फोनवरून खूप उपयुक्त अशी चर्चा पूर्ण केली. यामध्ये आम्ही व्यापार, फेंटानिल, रशिया आणि युक्रेनमधील युद्ध समाप्त करण्याची आवश्यकता, आणि टिकटॉक कराराला मंजूरी यांसारख्या अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रगती केली," असे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.आम्ही दक्षिण कोरियामधील APEC शिखर परिषदेत भेटू यावर देखील माझे आणि राष्ट्राध्यक्ष शी यांचे एकमत झाले, पुढील वर्षाच्या सुरुवातीला मी चीनला जाईन, आणि त्याच प्रमाणे राष्ट्राध्यक्ष शी हे योग्य वेळी अमेरिकेत येतील. हा फोन कॉल चांगला होता, आणि आम्ही पुन्हा फोनवरून बोलू, टिकटॉकच्या मंजुरीबद्दल मी आनंद व्यक्त करतो, आणि दोघेही APEC मध्ये भेटण्यास उत्सुक आहोत!" असेही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत.यापूर्वी अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले होते की फोन कॉल हा सकाळी इस्टर्न टाईन ८ वाजता (१२०० GMT) सुरू झाला आणि यामध्ये व्यापारावर देखील चर्चा झाली. चीन सरकारी चॅनल सीसीटीव्हीने या संवादाची पुष्टी केली आहे, मात्र यातील तपशील उघड केलेला नाही. दरम्यान टिकटॉकची मूळ कंपनी BYTEDANCE ने त्यांची अमेरिकेतली मालमत्ता विकली नाहीतर जानेवारी २९२५ पर्यंत अमेरिकन वापरकर्त्यांसाठी टिकटॉक बंद करण्याचे आदेश काँग्रेसने दिले होते. पण ट्रम्प यांनी विक्रीसाठी वेळ हवा असल्याचे आणि अमेरिकेत टिकटॉक वापरणाऱ्या मोठ्या समुदायाला नाराज करायचे नसल्याचे सांगत हे आदेश लागू केले नाहीत.मी आत्ताच चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याबरोबर फोनवरून खूप उपयुक्त अशी चर्चा पूर्ण केली. यामध्ये आम्ही व्यापार, फेंटानिल, रशिया आणि युक्रेनमधील युद्ध समाप्त करण्याची आवश्यकता,

### टिकटॉक कराराला मंजूरी

मी आत्ताच चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याबरोबर फोनवरून खूप उपयुक्त अशी चर्चा पूर्ण केली. यामध्ये आम्ही व्यापार, फेंटानिल, रशिया आणि युक्रेनमधील युद्ध समाप्त करण्याची आवश्यकता, आणि टिकटॉक कराराला मंजूरी यांसारख्या अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रगती केली," असे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

आणि टिकटॉक कराराला मंजूरी यांसारख्या अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रगती केली," असे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.आम्ही दक्षिण कोरियामधील APEC शिखर परिषदेत भेटू यावर देखील माझे आणि राष्ट्राध्यक्ष शी यांचे एकमत झाले, पुढील वर्षाच्या सुरुवातीला मी चीनला जाईन, आणि त्याच प्रमाणे राष्ट्राध्यक्ष शी हे योग्य वेळी अमेरिकेत येतील. हा फोन कॉल चांगला होता, आणि आम्ही पुन्हा फोनवरून बोलू, टिकटॉकच्या मंजुरीबद्दल मी आनंद व्यक्त करतो, आणि दोघेही APEC मध्ये भेटण्यास उत्सुक आहोत!" असेही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. यापूर्वी अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले होते की फोन कॉल हा सकाळी इस्टर्न टाईन ८ वाजता (१२०० GMT) सुरू झाला आणि यामध्ये व्यापारावर देखील चर्चा झाली. चीन सरकारी चॅनल सीसीटीव्हीने या संवादाची पुष्टी केली आहे, मात्र यातील तपशील उघड केलेला नाही. दरम्यान टिकटॉकची मूळ कंपनी BYTEDANCE ने त्यांची अमेरिकेतली मालमत्ता विकली नाहीतर जानेवारी २९२५ पर्यंत अमेरिकन वापरकर्त्यांसाठी टिकटॉक बंद करण्याचे आदेश काँग्रेसने दिले होते. पण ट्रम्प यांनी विक्रीसाठी वेळ हवा असल्याचे आणि अमेरिकेत टिकटॉक वापरणाऱ्या मोठ्या समुदायाला नाराज करायचे नसल्याचे सांगत हे आदेश लागू केले नाहीत.

# सोशल मीडिया हाताबाहेर जातोय

## ऑनलाइन फसवणुकीस चालना मिळते : सरन्यायाधीश गवई



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचे शेजारील राष्ट्र नेपाळमध्ये सप्टेंबर २०२५ मध्ये सोशल मीडियावर घालण्यात आलेल्या बंदीने देशभरात अभूतपूर्व असंतोष निर्माण केला आणि अखेरीस हिंसाचार उसळला. सरकारने फेसबुक, यूट्यूब, एक्स (पूर्वीचा ट्विटर), टिकटॉक, व्हॉट्सॲपसह तब्बल २६ लोकप्रिय प्लॅटफॉर्मर्सवर बंदी घातली.**

सरकारचे म्हणणे होते की या माध्यमांतून खोट्या बातम्या, अफवा, द्वेषपूर्ण प्रचार, बनावट खाती आणि ऑनलाइन फसवणुकीस चालना मिळते, म्हणूनच नियमांनुसार या कंपन्यांनी नोंदणी करावी व नेपाळमध्ये कार्यालय स्थापन करावे, ही अट पूर्ण न केल्यामुळे बंदी अपरिहार्य झाली. पण या निर्णयामुळे आधीच बेरोजगारी, महागाई आणि राजकीय अस्थिरतेमुळे त्रस्त असलेल्या तरुणांमध्ये तीव्र असंतोष पेटला. सोशल मीडिया हेच त्यांचे संवाद, विचार मांडण्याचे आणि संघटित होण्याचे माध्यम असल्याने अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आली, अशी भावना उफाळून आली. या पार्श्वभूमीवर "भ्रष्टाचार थांबवा, सोशल मिडिया नको" अशा घोषणांसह हजारो युवक रस्त्यावर उतरले. काठमांडूसह इतर शहरांत निदर्शने चिघळली आणि दगडफेक गोळीबार करून जमाव पांगवण्याचा प्रयत्न केला. यात किमान १९ जणांचा मृत्यू झाला आणि शेकडो जखमी झाले.परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच सरकारला काही दिवसांतच बंदी मागे घ्यावी लागली. त्याचबरोबर मोठ्या दडपणाखाली गृहमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला.

### न्या. गवईंचा निर्णय काय?

सोशल मिडीयामुळे उसळलेल्या हिंसाचारावर सरन्यायाधीश गवई यांनी महत्वाचा निर्णयही घेतला.सरन्यायाधीश गवई यांनी दोन दिवसांपूर्वी एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान वादग्रस्त वक्तव्य केले होते. खजुराहो येथील भगवान विष्णु यांची मूर्ती दुरुस्ती करण्याबाबत दाखल याचिकेच्या सुनावणीदरम्यान त्यांनी थेट याचिकाकर्त्याला सांगितले की, स्वत:ला विष्णुचे अनुयायी मानता तर जा आणि देवालाच म्हणा काहीतरी करा म्हणून.

# ‘रसोडे में कौन था?’ फेम यशराज मुखाटे अडकला लग्नबंधनात

कोरोना काळात स्वतःच्या वेगळ्या शैलीमुळे घराघरात पोहोचलेला आणि प्रसिद्ध झालेला संगीतकार, गायक म्हणजे यशराज मुखाटे. संवादावरून मजेशीर गाणी बनवून त्याने प्रेक्षकांच्या मनात एकच वेगळं स्थान निर्माण केलं. ‘रसोडे में कौन था?’ , ‘त्वाड्डा कुत्ता टॉमी, साड्डा कुत्ता, कुत्ता’ अशी बरीच मजेशीर गाणी त्याची जगभरात हिट झाली. त्यामुळे सोशल मीडियावर त्याचा मोठा चाहता वर्ग आहे. असा हा प्रसिद्ध यशराज मुखाटे आज लग्नबंधनात अडकला आहे. त्याने ही आनंदाची बातमी सोशल मीडियाद्वारे शेअर केली आहे.गेल्या बऱ्याच दिवसांपासून अनेक कलाकार लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या वाटेवर पाऊल ठेवताना दिसत आहेत. आता यादीत यशराज मुखाटेचं नाव सामील झालं आहे. त्याच्या लग्नाचा पहिला फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.यशराजने नोंदणी पद्धतीत गर्लफ्रेंड अल्पनाशी लग्न केलं आहे. लग्नाचा पहिला फोटो शेअर करत यशराज



म्हणाला की, आज दोन मोठ्या गोष्टी घडल्या. एक म्हणजे अल्पना आणि मी नोंदणी पद्धतीत लग्न केलं. तर दुसरी म्हणजे माझं नवीन गाणं प्रदर्शित झालं आहे, ‘मन धागा’. याची लिंक बायोमध्ये दिली आहे.दरम्यान, यशराजच्या या पोस्टवर बॉलीवूडसह मराठी कलाकारांनी प्रतिक्रियेद्वारे शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. मिथिला पालकर, दिप्ती देवी अशा अनेक कलाकारांनी यशराज व अल्पनाला शुभेच्छा दिल्या आहेत.

## हृता दुर्गुळेच्या 'कन्नी'चा ट्रेलर

मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री हृता दुर्गुळे (HRUTA DURGULE) आणि अजिंक्य राऊत (AJINKYA RAUT) सध्या त्यांच्या आगामी 'कन्नी' (KANNI) या सिनेमामुळे चर्चेत आहेत. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या सिनेमाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. टाळ्या, शिट्यांच्या जल्लोषात हृता दुर्गुळेच्या 'कन्नी'चा ट्रेलर आऊट करण्यात आला आहे. ‘कन्नी’ चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा नुकताच दणक्यात पार पडला. यावेळी चित्रपटातील कलाकार ऋता दुर्गुळे, शुभंकर तावडे, वल्लरी विराज, ऋषी मनोहर आणि अजिंक्य राऊत यांनी चित्रपटातील गाण्यांवर धमाकेदार परफॉर्मन्स सादर केले. या सोहळ्यात अधिक रंगत आणली ती गाण्यांच्या लाईव्ह परफॉर्मन्सने. एकंदरच टाळ्या, शिट्या, धमाल असे उत्साही वातावरण होते. कलाकारांनी यावेळी काही मजेदार किस्सेही शेअर केले. या सोहळ्याला चित्रपटाच्या संपूर्ण टीमसह अनेकांची उपस्थित होती. समीर जोशी लिखित, दिग्दर्शित ‘कन्नी’ चित्रपट येत्या 8 मार्च रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाची निर्मिती अमित भरगड, गगन मेश्राम, वैभव भोर, सनी राजानी यांनी केली आहे. चित्रपटाची खासियत म्हणजे अमित भरगड, गगन मेश्राम आणि सनी राजानी यांचा बऱ्याच बॉलिवूड चित्रपटांमध्ये सहभाग आहे आणि त्यांचे सहकार्य ‘कन्नी’ला लाभले आहे.



## आता जबाबदारी आणखी वाढली

वा रंगकर्मी ऋतुजा बागवेलाअभिनयासाठी संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. अभिनयासाठी तिला हा पुरस्कार जाहीर झाला असून सर्वत्र तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आता जबाबदारी आणखी वाढली असल्याची प्रतिक्रिया अभिनेत्रीने दिली आहे. संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर एबीपी माझासोबत बोलताना ऋतुजा बागवे म्हणाली,"संगीत नाटक अकादमी"चा पुरस्कार जाहीर झाल्याचा आनंद आहे. एकांकिकांपासून सुरू झालेला हा प्रवास थक्क करणारा आहे. संगीत नाटक अकादमीचा मानाचा पुरस्कार आपल्याला जाहीर झालाय यावर सुरुवातीला विश्वास बसत नव्हता. पण नंतर शुभेच्छांचा वर्षाव व्हायरला सुरुवात झाली".ऋतुजा म्हणते,"संगीत नाटक अकादमी"चा पुरस्कार जाहीर झाल्याने कृतज्ञनेची भावना जास्त आहे. करिअरच्या सुरुवातीला हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामुळे आणखी जबाबदारी वाढली आहे. पुढे कोणतही काम करताना या जबाबदारीनेच मी करेल". ऋतुजा बागवे अभिनीत 'अनन्या' हे नाटक चांगलच गाजलं. या भूमिकेसाठी तिने खूप मेहनत घेतली होती. त्याबद्दल बोलताना ऋतुजा म्हणाली,"अनन्याने मला खूप काही दिलं आहे. अभिनेत्री म्हणून आदर मिळवून देण्यापासून ते ओळख मिळवून देण्यापर्यंत अनेक गोष्टी अनन्याने दिल्या आहेत. आजही लोक अनन्या म्हणून मला ओळखतात. यापुढे अनेक चॅलेंजिंग भूमिका साकारण्याची माझी इच्छा आहे. सध्या माझा कोणताही ड्रीम रोल नाही. खूप वैविध्यपूर्ण भूमिका मला करायच्या आहेत". महाराष्ट्र भूषण ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ (ASHOK SARAF) यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच युवा रंगकर्मी ऋतुजा बागवे, ढोलकीवादक विजय चव्हाण, शास्त्रीय गायिका कलापिनी कोमकली, नंदिनी गुजर, सिद्धी उपाध्ये, महेश सातारकर, प्रमिला सूर्यवंशी, अनुजा झोकरकर, सारंग कुलकर्णी, नागेश आडगावकर आणि प्रियंका ठाकूर यांनाही हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.ऋतुजा बागवेने नाट्यक्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी तिला संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. 25 हजार रुपये, ताम्रपत्र आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरूप असणार आहे.

## “घटस्फोट आणि माझं प्रोफेशन

परफेक्शनिस्ट आमिर खान आणि चित्रपट निर्माती किरण राव १५ वर्षांच्या संसारानंतर २०२१ मध्ये वेगळे झाले. त्यांच्या मुलाचा (आझादचा) ते दोघे मिळून सांभाळ करतात. अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत किरण रावने आझादला कोणताही त्रास होऊ न देता, सहजपणे घेतलेल्या त्यांच्या घटस्फोटाविषयी सांगितले. डीएनएला दिलेल्या मुलाखतीत, किरण राव आणि आमिर खानला त्यांच नातं का बदलावंसं वाटलं? याबाबत किरण रावने खुलासा केला. किरण राव म्हणाली, “घटस्फोट आणि माझं प्रोफेशन या दोन्ही माझ्या वैयक्तिक गोष्टी मी सहजपणे सांभाळू शकले. आम्हाला आमच्या नात्याची व्याख्या बदलायची आहे, असा निर्णय आम्ही दोघांनी घेतला. आम्ही सहजरीत्या वेगळे झालो. कारण- सर्वांसमोर वेगळं होण्याचा निर्णय घेऊन आम्हाला आझादला दुखवायचं नव्हतं.”वेगळं होण्याचा निर्णय त्यांनी कोरोनाच्या काळात घेतल्यामुळे एकाच ठिकाणी राहून घटस्फोटाचा निर्णय घेण्यास त्यांना मदत झाली. किरण म्हणाली, “आम्ही खूप नशीबवान होतो. कारण- आम्ही दोघेही त्यावेळी एकाच घरात राहत होतो. त्या निर्णयानंतरही आमचं आयुष्य तेवढं बदललं नाही.”किरण पुढे म्हणाली, “कोविडमुळे आम्ही खूप वेळ एकत्र घालवला. आम्ही एकत्र काम करतोय. कामासाठी एकमेकांवर अजूनही अवलंबून आहोत याची मला खूप कदर आहे.”दरम्यान, किरणच्या कामाबद्दल सांगायचे झाले, तर किरण सध्या तिच्या आगामी चित्रपट ‘लापता लेडीज’च्या प्रतीक्षेत आहे.



## कतरिनाबरोबरच्या नात्याबाबत भाष्य

बॉलीवूड किंग शाहरुख खान नेहमी चर्चेत असतो. अभिनयाच्या जोरावर शाहरुखने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सोशल मीडियावर शाहरुख मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत तो चाहत्यांना अपडेट देत असतो. जगभरात शाहरुखचे लाखो चाहते आहेत. शाहरुखबद्दल प्रत्येक गोष्ट जाणून घेण्यास चाहते नेहमीच उत्सुक असतात.शाहरुखने टेलिव्हिजनवरून करिअरला सुरुवात केली. मालिकेपासून चित्रपटांपर्यंतचा शाहरुखचा प्रवास म्हणावा तेवढा सोपा नव्हता. शाहरुखच्या कठीण काळात त्याला मदत केली ती निर्माते विवेक वासवानी यांनी. वासवानी यांनी शाहरुखला चित्रपटात केवळ लॉंचच केले नाही, तर संघर्षमय काळात त्याला आपल्या घरी राहण्यास जागाही दिली होती. एकेकाळी विवेक व शाहरुख खास मित्र मानले जायचे. अनेक किस्से सांगितले आहेत.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत विवेक यांनी शाहरुखबाबत अनेक खुलासे केले आहेत. ते म्हणाले, “शाहरुख आणि मी एकमेकांशी बोलतही नाही आणि भेटतही नाही. पण जेव्हा कधी आम्ही एकमेकांना भेटतो, तेव्हा आम्हाला आम्ही कालच भेटलो होतो.

**आशिया चषक २०२५**

## सामना जिंकल्यानंतर केली मन जिंकणारी कृती

# मानलं राव सूर्या दादाला!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि ओमान या दोन्ही संघांमध्ये आशिया चषक २०२५ स्पर्धेतील साखळी फेरीतील शेवटचा सामना पार पडला. भारतीय संघाने आधीच सुपर ४ मध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे. त्यामुळे या सामन्याचा गुणतालिकेवर फारसा फरक पडणार नव्हता. पण ओमान संघाकडून देखील दमदार खेळ पाहायला मिळाला. नवखा संघ असूनही ओमानने भारतीय संघाला कडवी झुंज दिली. १८९ धावांचा पाठलाग करताना ओमानचा संघ विजयाच्या अगदी जवळ पोहोचला होता. पण शेवटी हा सामना भारताने २१ धावांनी आपल्या नावावर केला. दरम्यान सामना झाल्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवने मन जिंकणारी कृती केली आहे.**

## ओमान संघातील खेळाडूंची भेट




ओमानचा संघ पहिल्यांदाच आशिया चषक स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. त्यामुळे हा अनुभव त्यांच्यासाठी नवीन होता. स्पर्धेतील तिन्ही सामने त्यांनी गमावले. पाकिस्तान आणि युएईविरुद्धच्या सामन्यात ओमानचा एकतर्फी पराभव झाला. पण जगातील अव्वल क्रमांकाच्या संघाविरुद्ध खेळताना या संघाने पूर्ण जोर लावला. हा संघ विजयाच्या अगदी जवळ पोहोचला होता. पण शेवटी भारतीय खेळाडूंनी आपल्या अनुभवाचा फायदा घेतला आणि सामना जिंकला.सूर्यकुमार यादव आधी सर्व खेळाडूंना फलंदाजीला पाठवलं आणि स्वतः बाहेर बसून राहिला. सामना झाल्यानंतर त्याने ओमानच्या खेळाडूंची भेट घेतली. खेळाडूंसोबत फोटो काढले. यासह नवख्या संघातील खेळाडूंना आपला अनुभव सांगितला. यासह खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवला. सूर्यकुमार यादवने केलेल्या या कृत्याचं जोरदार कौतुक होत आहे.या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना २० षटकांअखेर ८ गडी बाद १८८ धावा केल्या. भारताकडून संजू सॅमसनने सर्वाधिक ५६ धावांची खेळ केली. तर अभिषेक शर्माने ३८ धावा केल्या. ओमानला हा सामना जिंकण्यासाठी १८९ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना ओमानकडून आमिर कलीमने सर्वाधिक ६४ धावांची खेळी केली. तर हमद मिर्झाने ५१ धावा केल्या. या दोघांनी ओमानला विजयाच्या जवळ घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. पण ओमानचा संघ विजयापासून २१ धावा दूर राहिला.ओमानचा संघ पहिल्यांदाच आशिया चषक स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. त्यामुळे हा अनुभव त्यांच्यासाठी नवीन होता. स्पर्धेतील तिन्ही सामने त्यांनी गमावले. पाकिस्तान आणि युएईविरुद्धच्या सामन्यात ओमानचा एकतर्फी पराभव झाला. पण जगातील अव्वल क्रमांकाच्या संघाविरुद्ध खेळताना या संघाने पूर्ण जोर लावला. हा संघ विजयाच्या अगदी जवळ पोहोचला होता.सूर्यकुमार यादव आधी सर्व खेळाडूंना फलंदाजीला पाठवलं आणि स्वतः बाहेर बसून राहिला. सामना झाल्यानंतर त्याने ओमानच्या खेळाडूंची भेट घेतली. खेळाडूंसोबत फोटो काढले. यासह नवख्या संघातील खेळाडूंना आपला अनुभव सांगितला. यासह खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवला. सूर्यकुमार यादवने केलेल्या या कृत्याचं जोरदार कौतुक होत आहे.या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना २० षटकांअखेर ८ गडी बाद १८८ धावा केल्या. भारताकडून संजू सॅमसनने सर्वाधिक ५६ धावांची खेळ केली.

### भारतीय संघाचा विजय

अभिषेक शर्माने ३८ धावा केल्या. ओमानला हा सामना जिंकण्यासाठी १८९ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना ओमानकडून आमिर कलीमने सर्वाधिक ६४ धावांची खेळी केली. तर हमद मिर्झाने ५१ धावा केल्या. या दोघांनी ओमानला विजयाच्या जवळ घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. पण ओमानचा संघ विजयापासून २१ धावा दूर राहिला.

# याला म्हणतात सामन्याचा टर्निंग पॉईंट झेल!

## हार्दिक पंड्याने सीमारेषेजवळ टिपला चकित करणारा कॅच

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाने ओमानविरूद्ध विजय मिळवत विजयाची हॅटट्रिक लगावली. पण नवख्या ओमानने मात्र भारताविरूद्ध उत्कृष्ट कामगिरी करत त्यांना सहज विजय मिळवू दिला नाही. पण भारतीय संघाने सामन्यात पुनरागमन करत विजय मिळवला. पण या सामन्यात हार्दिक पंड्याने सीमारेषेजवळ टिपलेला झेल सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला.**




भारताने प्रथम फलंदाजी करताना १८८ धावा केल्या, पण प्रत्युत्तरात ओमानच्या फलंदाजांनी दमदार कामगिरी करत सर्वांची मनं जिंकली. ओमानने २० षटकांत ४ गडी गमावून १६७ धावा केल्या. ओमानकडून ४३ वर्षीय अमीर कलीमने सर्वाधिक ६४ धावा केल्या. हमाद मिझ्नेही ३३ चेंडूत ५१ धावा केल्या. जतिंदर सिंगने ३३ चेंडूत ३२ धावांची खेळी केली. भारताची गोलंदाजी फारशी चांगली झाली नाही. हार्दिक पंड्या, अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी एक विकेट घेता आली. या सामन्यात ओमानचे फलंदाज भारताच्या गोलंदाजांची शाळा घेत असतानाच आता सामना भारताच्या निसटतो की काय अक्षरश: अशी स्थिती निर्माण झाली होती.

इतक्यात हर्षित राणाच्या १८व्या षटकात हार्दिक पंड्याने एक उत्कृष्ट झेल टिपत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. ओमानचा फलंदाज आमीर कलीम मैदानात मोठमोठे फटके खेळत होता. हर्षितच्या १८व्या षटकात त्याने पहिल्या दोन चेंडूवर दोन चौकार लगावले होते आणि नंतर चौथ्या चेंडूवर मोठा फटका खेळण्यासाठी त्याने उजव्या बाजूला फ्लिक केला. तिथे फाईन लेगवर पंड्या तैनात होता.

### बुमराहने देखील कौतुक केलं

तर त्याने स्वत:चं शरीर सावरत सीमारेषेला पाय लागणार नाही याची पूर्णपणे काळजी घेतली.हार्दिक पंड्याचा हा झेल पाहून वरूण चक्रवर्तीने तर तोंडावर हात ठेवत आश्चर्य व्यक्त केलं. तर बुमराहने देखील चकित होत त्याच्या झेलचं कौतुक केलं. हार्दिकचा हा झेल सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरला. अमीर कलीम मैदानावर चांगलाच सेट झाला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। शनिवार ।
। दि. 20 सप्टेंबर 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## बारकाईने अभ्यास करत संधीचे सोने करा

# आयुष्यातील आव्हाने यशाची संधी - अश्विनी मट्टू

### शिक्षण विश्व: एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये 'आरंभ 2025' व्दारे नवीन शैक्षणिक वर्षास सुरुवात



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयुष्यात प्रयत्न केले तरच समोर आलेल्या प्रश्नांची सोडवणूक करून यश संपादन करता येईल. अन्यथा अनेक संधी हातून सुटून जातील. समोर आलेले आव्हान आपल्याला सिध्द करण्यासाठी मिळालेली ही एक मोठी संधी आहे, असा विचार करून बारकाईने अभ्यास करत संधीचे सोने करा, असे मार्गदर्शन टाटा इव्हीचे वरिष्ठ महाव्यवस्थापक अश्विनी मट्टू यांनी विद्यार्थ्यांना केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या २०२५-२७ या नवीन शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे 'आरंभ - २०२५' या कार्यक्रमाद्वारे स्वागत करण्यात आले. यावेळी मट्टू यांनी 'लिडरशीप इन ए चेंजिंग वर्ल्ड' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी रेव्हुलेशन टेक्स ॲण्ड फाऊंडर मिथ्या ४ डी स्टेशनरीचे श्रीकांत झावर, बजाज फायनान्स लि. चे एचआर आणि व्यवस्थापन प्रमुख थॉमस ऑगस्टीन, एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर आदी उपस्थित होते.

एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक गुणवत्ता विकसित करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. प्राध्यापक, कर्मचारी मदतीसाठी तत्पर असतात. अल्पावधीतच दर्जेदार उच्च शिक्षण देणारी संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे. पीसीईटी विश्वस्त मंडळाच्या दूरदृष्टी नेतृत्वाखाली संस्था प्रगती करत आहे, असे डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.

श्रीकांत झावर यांनी 'दी पॉवर ऑफ ग्रोथ माईंड सेट' या विषयावर मार्गदर्शन केले. काही व्यक्ती आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार नसतात. आहे त्या परिस्थितीत सुरक्षित राहण्याचा मार्ग निवडतात. परंतु प्रगती करायची असेल तर समस्येला तोंड देत उत्तरे शोधून यश संपादन करता येते, असे झावर यांनी सांगितले. आपले ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी प्रचंड मेहनत, कष्ट करा. विचार करा, प्रश्न विचारत रहा, म्हणजे तुम्ही पुढील आयुष्यात उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल कराल, असे थॉमस ऑगस्टीन यांनी 'ट्रान्झिक्टिंग फ्रॉम कॅम्पस लाईफ टू कार्पोरेट वर्ल्ड' या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले. यानंतर प्रमुख वक्त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रश्न, शंकांचे निरसन केले. दुपारच्या सत्रात युएसव्ही प्रा. लि. चे थंबूराज अंतूवन, टॅलेंट रिसोर्सेसच्या जूही गुप्ता यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन यांनी मानले.

---

## महापालिका शाळांमध्ये आता 'लडाख पॅटर्न'

### सोनम वांगचुक यांनी सुरु केलेली शिक्षण पद्धत सुरु करण्याचे नियोजन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेच्या वतीने दिल्ली येथील म्युनिसिपल स्कूलच्या धर्तीवर शिक्षण पॅटर्न राबविण्यात येत आहे. त्यासाठी महापालिकेने कोट्यवधी रुपयांचा खर्च केला आहे. आता लडाख पॅटर्न राबविला जाणार आहे. त्यासाठी आयुक्तांसह वरिष्ठ अधिकारी व शिक्षकांनी नुकताच लडाखचा अभ्यास दौरा केला. या नव्या शिक्षण पद्धतीने विद्यार्थ्यांना कितपत लाभ होणार? याची उत्सुकता आहे.**



तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी महापालिका शाळेत एकसूत्रता यावी, म्हणून दिल्लीतील म्युन्सिपल स्कूलचा अंगीकार केला. त्यासाठी महापालिकेचे पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक यांचा दिल्लीत अभ्यास दौरा झाला. तीन ते चार वेगवेगळे अभ्यास दौरे झाले. दिल्लीच्या म्युन्सिपल स्कूलप्रमाणे महापालिका शाळेत सुधारणा करून शिक्षण पद्धती राबविली जात आहे, असे असताना आता लडाख येथील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या शिक्षण पद्धती महापालिका शाळेत आणण्याचे नियोजन सुरू झाले आहे. वांगचुक यांनी लडाख येथे सन १९८८ मध्ये स्टुडंट्स एज्युकेशनल ॲण्ड कल्चरल मूव्हमेंट ऑफ लडाख (एसईसीएमओएल) ही नापास विद्यार्थ्यांची शाळा सुरू केली. ती शाळा व्यावहारिक अनुभवावर आधारित आहे. त्यात मातृभाषेत शिक्षण दिले जाते. वांगचुक यांनी गीतांजली अंगमो यांच्यासोबत हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्हज लडाख (एचआयएएल) ची स्थापना केली आहे. वांगचुक यांनी सुरू केलेली शिक्षण पद्धत महापालिका शाळेत सुरू करण्याचे अधिकाऱ्यांचे नियोजन आहे. त्यासाठी आयुक्तांसह वरिष्ठ अधिकारी व शिक्षकांनी नुकताच लडाखचा अभ्यास दौरा केला आहे. तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी इंदूर शहराच्या धर्तीवर घनकचरा व्यवस्थापन कार्यपद्धती पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू केली. त्या अंतर्गत घराघरांतून ओला व सुका कचरा वेगवेगळा स्वीकारला जात आहे.

> सोनम वांगचुक यांच्या लडाख येथील शाळेला पालिकेच्या शिक्षण विभागाच्या शिक्षकांनी नुकतीच भेट दिली. एकूण २५ शिक्षकांना तेथे प्रशिक्षण देण्यात आले. लडाख येथील शिक्षणाची पद्धत पालिका शाळेत राबविण्यात येणार आहे. त्यामुळे अभ्यासक्रमासोबत विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानात भर पडणार आहे.
>
> **-किरणकुमार मोरे,** सहायक आयुक्त, महापालिका

## शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी - प्रा. राव तुमाला

## 25' आणि चौथ्या 'आयमेस-25' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दहा पंधरा वर्षात भारताने विज्ञान - तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने विकास केला आहे. नवकल्पना, निर्मिती, उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा खुबीने वापर केला जात आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत, असे प्रतिपादन मायक्रो इलेक्ट्रॉनिक पॅकिंग इनोव्हेशन्सचे पुरस्कर्ते प्रा. राव तुमाला यांनी केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील शैक्षणिक संकुलातील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे नवव्या 'आयसीसीयुबीईए-२५' आणि चौथ्या 'आयमेस-२५' या दोन आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. ही परिषद दोन दिवसांची असून 'संगणन, संप्रेषण, नियंत्रण आणि ऑटोमेशन' तसेच 'यांत्रिक अभियांत्रिकी मधील नवकल्पना' या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सादरीकरण, चर्चा होणार आहे. याप्रसंगी प्रा. तुमाला यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी आयईईईचे पुणे विभागीय प्रमुख डॉ. अमर बुचडे, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे, 'आयसीसीयुबीईए-२५' जनरल चेअर डॉ. जयश्री कट्टी, 'आयमेस-२५'जनरल चेअर डॉ. नरेंद्र देवरे आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समाजाला चांगल्या सेवा मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी नवकल्पना, संशोधनाला चालना मिळावी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संवाद साधला पाहिजे, या हेतूने आयईईई काम करत आहे. पीसीसीओई मध्ये आज होत असलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये संगणन, संप्रेषण, ऑटोमेशन तसेच यांत्रिक अभियांत्रिकी'चे विषय निवडण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना भविष्यात याचा मोठा फायदा होईल, असे मत डॉ. अमर बुचडे यांनी व्यक्त केले.

या परिषदेसाठी देशासह सोळा देशांमधून बाराशे चाळीस प्रवेशिका आल्या. त्यामधून २१४ शोध निबंधांची निवड करून त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे, असे डॉ. जयश्री कट्टी यांनी सांगितले. 'आयमेस' साठी २६० प्रवेशिकां मधून १२० शोध निबंधांची निवड करण्यात आली, असे डॉ. नरेंद्र देवरे यांनी सांगितले.

डॉ. गोविंद कुलकर्णी म्हणाले, की संशोधकांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देऊन व्यासपीठ मिळवून देण्यासाठी; तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधकांशी ओळख होण्यासाठी ही परिषद उपयुक्त आहे.


यावेळी परिषदे विषयी माहिती असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. या परिषदेसाठी विविध देशांतील प्रतिनिधी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अंजली श्रीवास्तव, डॉ. संदीप पाटील यांनी केले. आभार डॉ. स्वाती जगताप यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करून परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या.

---

## मोहननगर परिसरात वारंवार वीज खंडित

## नागरिक संतप्त; भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**

मोहननगर परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. याविरोधात नागरी हक्क कृती समितीच्या वतीने भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन दिले आहे. महावितरणचा गलथान आणि नियोजनशून्य कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली. मोहननगरमधील वीज प्रश्नाबाबत शिष्टमंडळाने भोसरीचे उपअभियंता एस. एस. क्षीरसागर यांना निवेदन दिले. त्यावेळी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, संजय जगताप, माधव निर्लेकर, महेश पंडित आदी उपस्थित होते. कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांच्याशीही चर्चा झाली.

मोहननगरमधील विद्युत रोहित्रावर भार अधिक असल्यामुळे उच्च दाब वाहिनीवर ताण येतो आणि त्यामुळे वारंवार समस्या येत आहेत. मोहननगर परिसरात वीजपुरवठा सतत खंडित होत आहे. विद्युत रोहित्राच्या जागेवर झाड, झुडपे आणि गवत वाढलेले आहे. या परिसराचा समावेश भोसरी विभागात नवीन जोडल्यामुळे कर्मचाऱ्यांची आणि शिडी गाडीची संख्या अपुरी आहे, ज्यामुळे कर्मचारी वेळेवर पोहोचू शकत नाहीत. लघुदाब वाहिनी (एलटी) व फीडर बॉक्स यांचा सर्व्हे करण्याची गरज आहे.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025-26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046